खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

## अर्थशास्त्र विभाग (UG)

### शैक्षणिक वर्ष 2023 – 2024 मधील उपक्रम अहवाल- Academic Calendar नुसार

शैक्षणिक वर्ष 2023 – 2024 मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. त्या सर्व उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १. | स्वागत समारंभ | दि. 1 सप्टेंबर 2023 |
| २. | तज्ञांचे व्याख्यान **मा. डॉ. सुनील उगले** अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) | दि. 11 सप्टेंबर 2023<br>**विषय -** "अर्थशास्त्र विषयाच्या संधी" |
| ३. | प्रा. सुभाष रणशूर (एस.एन.डी.टी विद्यापीठ, पुणे) | 28 ऑक्टोबर २०२३<br>**विषय -** "संशोधन लेख आणि संशोधन प्रकल्प" |
| ४. | बँक भेट | बुधवार दि. 25 ऑक्टोबर 2023<br>(राजगुरुनगर सहकारी बँक - मुख्य कार्यालय) |
| ५. | Economic Forum | प्रत्येक महिन्याच्या शनिवारी |
| ६. | "सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्स बँकिंग अँड फायनान्स" शॉर्ट टर्म कोर्स उद्घाटन | शनिवार दि. 24 फेब्रुवारी 2024 |
| ७. | प्राजक्ता मांजरे | बुधवार दि. 28 फेब्रुवारी 2024<br>**विषय -** "राजगुरुनगर सहकारी बँक बँकिंग क्षेत्रातील आव्हाने आणि संधी" |
| ८. | प्रा.जयश्री आरुडे | शुक्रवार दि.1 मार्च 2024<br>**विषय -** "बँकिंग क्षेत्रातील गणितीय पद्धतीचा वापर" |
| ९. | प्रा. योगिता पटांगणे | शनिवार दि. 2 मार्च 2024 |

| | | |
|---|---|---|
| | | **विषय -** “Computer Language” |
| १०. | श्री विलास पोतले<br>(शाखाप्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, राजगुरुनगर) | बुधवार दि. 6 मार्च 2024<br>**विषय -** “मॉडर्न टेक्नॉलॉजी इन बँकिंग सेक्टर” |
| ११. | प्रा. डॉ. विकास रासकर | गुरुवार दि. 7/3/2024<br>**विषय -** “Significance of English Language in IBPS Exam” |
| १२. | श्री सोपान नाणेकर (एचडीएफसी- मॅनेजर) | शनिवार दि. 9 मार्च 2024<br>**विषय -** “ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी इन बँकिंग” |
| १३. | Bank Visit बँक अभ्यास भेट सेंट्रल बँक ऑफ इंडिया राजगुरुनगर | मंगळवार दि. 12 मार्च 2024 |
| १४. | जागतिक महिला दिननिमित्त “काव्यवाचन स्पर्धा” | गुरुवार दि. 15 मार्च 2024 |
| १५. | शैक्षणिक सहल (लोणावळा- महाड-पाली- उन्हेरे - काशीद बीच) | गुरुवार दि. 4 एप्रिल 2024 |
| १६. | सदिच्छा कार्यक्रम,शॉर्ट टर्म कोर्स प्रमाणपत्र वितरण आणि<br>**विशेष सत्कार -** निखिल भोगाडे सहाय्यक कक्ष अधिकारी नेमणूक | बुधवार दि. 10 एप्रिल 2024 |

**1.स्वागत समारंभ**

शुक्रवार दि.1 सप्टेंबर 2023 रोजी द्वितीय वर्ष अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉक्टर शिरीष पिंगळे सर तसेच उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे उपस्थित होते याप्रसंगी टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षात अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबचे पुष्प देऊन केले याप्रसंगी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**2. तज्ञांचे व्याख्यान:**

सोमवार दिनांक 11 सप्टेंबर 2023 रोजी सकाळी 9.15 वा. **मा. डॉ. सुनील उगले** अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांचे अर्थशास्त्र “विषयाच्या संधी” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यांप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते डॉ. सुनील उगले यांचा शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**3. तज्ञांचे व्याख्यान:**

शनिवार दिनांक 28 ऑक्टोबर २०२३ रोजी **प्रा. सुभाष रणशूर** एस.एन.डी.टी विद्यापीठ पुणे. यांचे “संशोधन लेख आणि संशोधन प्रकल्प” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सर तसेच उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे उपस्थित होते प्रा. सुभाष रणशूर यांनी विद्यार्थ्यांना संशोधन लेख आणि प्रकल्प यासंदर्भात सविस्तर असे मार्गदर्शन केले.

**4. बँक भेट:**

बुधवार दिनांक 25 ऑक्टोबर 2023 रोजी राजगुरुनगर सहकारी बँकच्या बँकेच्या मुख्य कार्यालयास भेट देण्यात आली. एम. ए. अर्थशास्त्र आणि टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील अध्ययवत माहिती प्रात्यक्षिक स्वरूपात मिळावी या हेतूसाठी बँक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. राजेंद्र शिरसी आणि प्रा. वर्षा वाळुंज उपस्थित होते.

**5. Economic Forum:**

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने Economic Forum ची स्थापना गेल्या अनेक वर्षापासून झालेली आहे Economic Forum अंतर्गत साधारणपणे प्रत्येक महिन्याच्या शनिवारी विद्यार्थ्यांना विविध संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाते. याप्रसंगी विद्यार्थी अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडींचा मागवा घेतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठावरून आपले विचार मांडण्याची संधी मिळते.

**E-Content:** अर्थशास्त्र विभागातील जवळपास प्रत्येक वर्गासाठी विषय शिक्षकांनी आपापले गूगल क्लासरूम सुरू केले आहेत या गुगल क्लासरूमवर नोट्स अपलोड केले आहेत.

**मध्यावधी परीक्षा:** प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष वर्षातील सर्व विद्यार्थ्यांची मध्यावधी परीक्षासोमवार दिनांक 18 सप्टेंबर 2023 ते शनिवार दिनांक 23 सप्टेंबर 2023 या कालावधीत संपन्न झाली.

अर्थशास्त्र विभागाच्या वरील सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. तसेच उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांचेही मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व उपक्रम यशस्वी होण्यासाठी अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारेप्राध्यापक प्रा. एस. व्ही. धानापुणे , प्रा. व्ही. एस. वाळुंज , प्रा. डॉ. भूषण वायकर यांचे सहकार्य मिळाले.

**6.उद्घाटन समारंभ**: शनिवार दिनांक 24/02/2024 रोजी सकाळी दहा वाजता मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या अध्यक्षतेखाली अर्थशास्त्र विभागाच्या "सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्स बँकिंग अँड फायनान्स" या शॉर्ट टर्म कोर्स चे उद्घाटन संपन्न झाले. सदर उद्घाटन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. एस. व्ही. धानापुणे मॅडम सुद्धा उपस्थित होते. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. शिरसी यांनी प्रास्ताविक करून शॉर्ट टर्म कोर्से उद्दिष्ट विशदकेले. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांनी बँकिंग क्षेत्रातील घडामोडींचा विद्यार्थ्यांनी बारकाईने अभ्यास करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. बी. ए. वायकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. वर्षा वाळुंज यांनी केले.

**व्याख्यान**:सोमवार दिनांक 26 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी 11 वाजता प्रा. डॉ. आर. एस. शिरसी यांचे आरबीआय ॲक्ट १९३४ या विषयावर व्याख्यान झाले.

**व्याख्यान**:मंगळवार दिनांक 27 2.2024 रोजी सकाळी अकरा वाजता प्रा.डॉ. बी. ए. वायकर यांचे बँकिंग या विषयावर व्याख्यान झाले.

**7.तज्ञांचे व्याख्यान**:

बुधवार दिनांक 28 2.2024 रोजी सकाळी नऊ वाजता प्राजक्ता मांजरे राजगुरुनगर सहकारी बँक यांचे बँकिंग क्षेत्रातील आव्हाने आणि संधी या विषयावर व्याख्यान झाले.

**8.तज्ञांचे व्याख्यान:**

शुक्रवार दिनांक एक मार्च 2024 रोजी सकाळी अकरा वाजता प्राध्यापिका जयश्री आरुडे यांचे "बँकिंग क्षेत्रातील गणितीय पद्धतीचा वापर" या विषयावर व्याख्यान झाले.

**9.तज्ञांचे व्याख्यान:**

शनिवार दिनांक 2 मार्च 2024 रोजी सकाळी अकरा वाजता प्रा. पटांगणे यांचे; Computer Language" या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.**व्याख्यान**:सोमवार दिनांक 4 मार्च 2024 रोजी संख्याशास्त्राची ओळख या विषयावर प्राध्यापिका वर्षा वाळुंजयांचे व्याख्यान झाले.

**10.तज्ञांचे व्याख्यान:** अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत बुधवार दिनांक 6/3/ 2024 रोजी सकाळी नऊ वाजता माननीय श्री विलास पोतले शाखाप्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, राजगुरुनगर यांचे "मॉडर्न टेक्नॉलॉजी इन बँकिंग सेक्टर" या विषयावर व्याख्यान झाले.

**11. तज्ञांचे व्याख्यान:** अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत गुरुवार दिनांक 7/3/2024रोजी सकाळी अकरा वाजता प्रा. डॉ. विकास रासकर सरांचे "Significance of English Language in IBPS Exam" या विषयावर व्याख्यान झाले.

**12. तज्ञांचे व्याख्यान:** अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत शनिवार दिनांक 9/ 3/ 2024 रोजी सकाळी दहा वाजता माननीय श्री सोपान नाणेकर मॅनेजर एचडीएफसी यांचे "ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी इन बँकिंग" या विषयावर व्याख्यान झाले.

**व्याख्यान**: अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत 11 3 2024 रोजी सकाळी अकरा वाजता प्रा. डॉ. आर. एस. शिरसी यांचे "बँकिंग क्षेत्रातील चालू घडामोडी" या विषयावर व्याख्यान झाले.

**13.Bank Visit बँक अभ्यास भेट:** अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत दिनांक 12/ 3/ 2024 रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडिया राजगुरुनगर या शाखेला सकाळी 11.30 वाजता अभ्यास भेट देण्यात आली.

**लेखी परीक्षा:** अर्थशास्त्र विभागाच्या शॉर्ट टर्म कोर्सची लेखी परीक्षा 13/3/2024रोजी सकाळी अकरा वाजता घेण्यात आली.

**14.जागतिक महिला दिननिमित्त "काव्यवाचन स्पर्धा"**

गुरुवार दि. 15 मार्च 2024 रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महिला दिन निमित्त काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत एस. वाय व टी.वाय.बी.ए मधील 12 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.त्यातील कविता वाचन,विषय,सदारीकरण विचारात घेऊन तीन क्रमांक काढण्यात आले.चौधरी पूजा,आंद्रे सेजल आणि अपूर्वा ठाकूर या विद्यार्थिनींचे क्रमांक आले.सदर स्पर्धेच्या निमित्ताने अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणा-या महिला प्राध्यापक प्रा. एस. व्ही. धानापुणे,प्रा. वर्षा वाळुंज यांचा सत्कार करून बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारे सर्व प्राध्यापक उपस्थित होते

**15.शैक्षणिक सहल (लोणावळा- महाड-पाली- उन्हेरे - काशीद बीच)**
**गुरुवार दि. 4 एप्रिल 2024**

आपल्या महाविद्यालयाची अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल लोणावळा- महाड-पाली-उन्हेरे - काशीद बीच इ. ठिकाणी दि. 4 एप्रिल 2024 मध्ये जाऊन आली. या अभ्यास सहलीचे संयोजन मा. डॉ. कैलास सोनावणे. डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. रोहोणी पाटोले व डॉ भूषण वायकर यांनी केले.लोणावळा- महड - पाली - उन्हेरे – काशीद बीच इ. ठिकाणी दि. 4 एप्रिल 2024 मध्ये गेली होती. सादर सहलीमध्ये एस. वाय / टी वाय बीए अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विद्यार्थी सहभागी झाले होते. कोकणात सदाहरित व निम सदाहरित आरण्ये आढळतात. यात नारळ, पोफळी, सुपारी, बिब्बा, निरगुडी इ. वनस्वतींचा समावेश होतो. नारळ हा कोकणचा कल्पवृक्ष आहे. कोकणात अनेक औषधी वनस्पती महत्त्वाच्या आहेत याचा अभ्यास विद्यार्थांनी केला.

**16.समारोप समारंभ:** अर्थशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्सड बँकिंग एन फायनान्स या शॉर्ट टर्म कोर्स समारोप समारंभ 10/04/2024 रोजी सकाळी दहा वाजता संपन्न झाला. या समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते सदर संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

**विशेष सत्कार समारंभ**: अर्थशास्त्र विभागाचा माजी विद्यार्थी निखिल भोगाडे या विद्यार्थ्यांची सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून नेमणूक झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि ग्रंथ भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांनी अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारे सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. बी. ए. वायकर, प्रा. एस. व्ही. धानापुणे मॅडम,प्राध्यापक वर्षा वाळुंज आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. शिरसी या सर्वांनी शॉर्ट टर्म कोर्स यशस्वी करण्यात आपली भूमिका बजावली. सदर कोर्स यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, महाविद्यालयाचे प्रबंधक या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष माननीय श्री नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर आणि सर्व संस्थेचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे शॉर्ट टर्म कोर्स यशस्वी संपन्न झाला. तसेच द्वितीय वर्ष कला आणि तृतीय वर्ष कला या वर्गातील अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी अतिशय उत्कृष्टपणे मोठ्या संख्येने या शॉर्ट टर्म कोर्सचा लाभ घेतलात्या सर्वांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

विभाग प्रमुख
अर्थशास्त्र
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, जि.पुणे

**विभाग प्रमुख**
**प्रो.डॉ.आर.एस.शिरसी**